# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{सा.बां.वि. (डी.पी.डी.सी.)}**

प्रभाग क्र. २२ अंतर्गत शहीद शंकर महल्ले, प्राथमिक शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने शहीद शंकर महल्ले, प्राथमिक शाळेची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याकरीता सादर.

**टिप** :-

१. प्रभाग क्र. २२ अंतर्गत शहीद शंकर महल्ले, प्राथमिक शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण झालेली असून, सार्वजनिक सुरक्षितेच्या संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीने तोडण्यात येत असून त्याठिकाणी जुनी महानगरपालिका शाळेच्या जागेवर ई-लायब्ररीचे बांधकाम करण्यात येत आहे.
२. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट नस्तीत संलग्न आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 31/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 13/01/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (डी.पी.डी.सी.), सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. २२ अंतर्गत शहीद शंकर महल्ले, प्राथमिक शाळेची इमारत शिकस्त व जिर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने शहीद शंकर महल्ले, प्राथमिक शाळेची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.